दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ३१ • Title - Code :- MAHMAR49513 • बुधवार दि.१८ ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## गडचिरोली पोलीस व सीआरपीएफची कारवाई

# सहा लाखांचे बक्षीस असणाऱ्या जहाल नक्षलवाद्याला अटक






**गडचिरोली । प्रतिनिधी**

काडचिरोली नक्षल चळवळीत सहभागी होत हिंसक कृत्य करणाऱ्या एका जहाल नक्षलवाद्याला गडचिरोली पोलीस व सीआरपीएफ जवानांनी संयुक्त अभियान राबवत एटापल्ली तालुक्यातील जाजावंडी-दोडर जंगल परिसरात मंगळवारी (१७ ऑक्टोबर) अटक केली. मेस्सी गिल्लू कवडो (५०) रा. रेखाभटाळ ता. एटापल्ली जि. गडचिरोली असे अटक करण्यात आलेल्या नक्षलवाद्याचे नाव आहे. शासनाने याच्यावर ६ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. विशेष म्हणजे गेल्या चार दिवसांत दोन जहाल नक्षलवाद्यांना अटक करण्यात गडचिरोली पोलिसांना यश आल्याने नक्षल चळवळीला मोठा हादरा बसला आहे.

सन १९८० पासून गडचिरोली जिल्हा नक्षलवाद्यांकडून करण्यात येणाऱ्या निरपराध नागरिकांच्या हत्येने ग्रासला आहे. या कालावधीत नक्षलवाद्यांकडून जाळपोळ करून विकासकामांमध्ये अडथळा आणणे तसेच विविध कंत्राटदारांकडून खंडणी वसूल करणे आदी देशविघातक कृत्य केलेले आहे. हे सर्व साध्य करण्यासाठी नक्षलवाद्यांकडे सुरक्षित पुरवठा साखळी असणे आवश्यक आहे. दरम्यान, १७ ऑक्टोबर रोजी जहाल नक्षलवादी मेस्सी गिल्लू कवडो (एसीएम) माड सप्लाय टीम हा मौजा जाजावडी दोहर जंगल परिसरात वास्तव्यास असल्याच्या माहितीवरून विशेष अभियान पथक, पोस्टे गट्टा (जां.) पोलीस पार्टी व सीआरपीएफ १९१ बटालियनच्या जवानांनी नक्षलविरोधी अभियान राबवून त्यास अटक केली. मेस्सो याच्यावर सन २०२३ मध्ये मौजा हिक्केर जंगल परिसरात झालेल्या पोलीस नक्षलवादी चकमकीवरून एटापल्ली पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.जहाल नक्षलवादी मेस्सो कवडो हा नक्षलवाद्यांच्या सप्लाय टीममध्ये एसीएम पदावर कार्यरत होता. तो नेहमी नक्षलवाद्यांना विविध स्फोटक साहित्य, दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करत असल्याने त्याची अटक गडचिरोली पोलीस दलासाठी महत्वाची ठरलेली आहे. तो १४ ऑक्टोबर २०१३ रोजी अटक झालेला जहाल नक्षलवादी डीव्हीसी चैतराम ऊर्फ सुक्कू बत्ते कोरसा याच्या सोबत काम करत होता. या दोघांना चार दिवसांत अटक केल्याने नक्षलवाद्यांच्या पुरवठा साखळीला मोठा धक्का बसला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) अनुज तारे, अपर पोलीस पोलीस अधीक्षक (प्रशासन) कुमार चिंता, अहेरीचे अपर पोलीस अधीक्षक यतिश देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली व हेडरीचे उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव दडस आणि सीआरपीएफ १९१ बटालियनचे असिस्टंट कमांडन्ट मोहीत कुमार यांचे नेतृत्वात पार पडली. यावेळी पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी नक्षलवाद्यांनी चळवळीतील हिंसक वाट सोडून आत्मसमर्पण करून सन्मानाने जीवन जगावे, असे आवाहन केले आहे.

## वरोरा येथील भाविक पवित्र प्रवास-ए-उमराहसाठी रवाना

**वरोरा । प्रतिनिधी**

येथील काही भाविक सोमवारी उमराहच्या पवित्र यात्रेसाठी रवाना झाले. यात्रेकरूंना त्यांच्या आनंदी प्रवासाला निरोप देण्यासाठी मोठ्या संख्येने स्थानिक लोक आले होते. शहरातील लोकांकडून जाणाऱ्या यात्रेकरूंना मक्का मदिना शरीफ येथे पोहचल्यावर शांततेसाठी प्रार्थना करण्याची विनंती यावेळी करण्यात आली. वरोरा येथील कुटुंबीय व नागरिकांनी फुलांचे हार घालून यात्रेकरूंना निरोप दिला.शहरातील प्रसिद्ध व दिलखुलास व्यक्तिमत्व आणि डेकोरेशन व केटरिंग व्यवसायात आपली एक वेगळी ओळख निर्माण करणारे इरफान रंगरेज आपल्या पत्नीसह पवित्र प्रवास-ए-उमराहसाठी रवाना झाले आहे. त्याच्यासोबत नसीम भाई, अयुब खान, बशीर शेख हेही सफर-ए-उमराहला रवाना झाले. यावेळी हाजी अहेतेशाम अली व हाजी सादिक अली यांनी शगुन लॉनवर पोहोचून सफर-ए-उमराहला जाणाऱ्या



नागरिकांचा सत्कार करून त्यांना गळाभेट देऊन, समस्त देशवासीयांसाठी प्रार्थना करण्याचे आवाहन केले. यावेळी हाजी अहेतेशाम अली यांनी म्हणाले की, वर्षातून एकदा हज केला जातो. पण उमराह वर्षाच्या कोणत्याही वेळी करता येतो. केवळ भाग्यवंतानाच मक्का आणि मदिना भेट देण्याची संधी मिळते.हे भाविक वरोरा येथून मुंबईसाठी नागपूरला रवाना झाले असून मुंबई वरून सायंकाळी सहा वाजता विमानाने मक्केला रवाना होतील.यावेळी हाजी अहेतेशाम अली, हाजी सादिक अली, नियाज सय्यद, जुबेर कुरेशी, इखलाक रंगरेज, फहीम काझी, जावेद शेख, कादर शेख, इम्रान शेख, सरीम सादिक अली यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## अजय कंकडालवार यांच्या हस्ते नवीन वर्ग खोलीचे लोकार्पण

**अहेरी । प्रतिनिधी**

अहेरी तालुक्यातील वांगेपल्ली ग्राम पंचायत अंतर्गत येत असलेल्या मौजा किष्टापुर(वा) येथील वर्ग खोली नसल्याने बालकांना शिक्षण घेण्यासाठी अडचण भासत होते.हि बाब वांगेपल्ली येथील सरपंच दिलीप मडावी व नागरिक-आविसं अजय मित्र परिवारचे कार्यकर्त्यांडून माजी जि.प.अध्यक्ष अजय कंकडालवार यांना अहेरी जनसंपर्क कार्यालय येते भेट घेऊन अजयभाऊंना सांगण्यात आली आहे.नागरिकांची मागणी लक्षात घेऊन.जिल्हा परिषद बांधकाम विभाग गडचिरोली अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना सन २०२१-२२अंतर्गत वांगेपल्ली येते जिल्हा परिषद शाळेच्या नवीन वर्ग खोली मंजूर करून दिले होते.

सदर वर्ग खोलीची काम पूर्णत्वास झाल्याने आविसं अजय मित्र परिवारचे विदर्भ नेते व माजी जि.प.अध्यक्ष तथा अहेरी बाजार समिती सभापती अजय कंकडालवार यांच्या शुभ हस्ते लोकार्पण करण्यात आली



आहे.वांगेपाल्ली येथील समस्त नागरिक अजयभाऊंची आभार मानले.यावेळी सरपंच दिलीप मडावी,ग्रामपंचायत सदस्य कल्पनाताई मडावी,नरेंद्र गर्गम,संतोष येरमे,केंद्र प्रमुख चीलवेलवार ,राहुडकर ,चलकेलवार ,कारेंगुलवार,पोषालू भोयर,यशवंत मडावी,बालाजी आलाम,बाबूराव नागपुरे,दिलीप पिपरे,महेश नैताम,प्रमोद गोडशेलवार,व्यंकटेश कासंगट्टुवार,गणेश मडावी,सोमा नैताम,राकेश सडमेकसह आविसं अजयभाऊ मित्र परिवारचे कार्यकर्ते व शाळेचे शिक्षकवृंद तसेच प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लाचखोर उप कार्यकारी अभियंता अडकला एसीबीच्या जाळ्यात

**गडचिरोली । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण कंपनी मर्यादीत, आलापल्ली ता. अहेरी जिल्हा गडचिरोली येथील उप-कार्यकारी अभियंता (वर्ग-२) विनोदकुमार नामदेवराव भोयर, वय ४७ वर्षे यांना २० हजार रुपयांची लाच रक्कम स्विकारताना अँटी करप्शन ब्युरो, गडचिरोलीच्या पथकाने १७ ऑक्टोबर रोजी रंगेहाथ पकडले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, यातील तक्रारदार यांना त्यांचे घरगुती मीटर फॉल्टी असल्याचे कारण सांगून गैरअर्जदार भोयर, उप-कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.क. मर्या. आलापल्ली यांनी अंदाजे २.२० लाख रुपये दंड भरावे लागेल, असे बोलून सदर दंडाची रक्कम कमी करुन ७३ हजार ६९८ रुपयांचा दंड केला व सदर दंडाची रक्कम कमी केल्याचा मोबदला म्हणून गैरअर्जदार भोयर यांनी ४० हजार रुपये लाच रक्कमेची मागणी केली. तक्रारदार यांना आरोपीस लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील अधिकाऱ्यांशी संपर्क साधून तक्रार दिली.पोलीस



निरीक्षक श्रीधर भोसले यांचे पर्यवेक्षणात पो. निरीक्षक शिवाजी राठोड यांनी तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीची अत्यंत गोपनीयरित्या शहानिशा करून सापळा कारवाईचे आयोजन केले असता, त्यामध्ये पडताळणी दरम्यान तक्रारदार यांना त्यांचे घरगुती मीटर फॉल्टी असल्याचे कारण सांगून गैरअर्जदार भोयर, उप-कार्यकारी अभियंता यांनी अंदाजे २.२० लाख रुपये दंड भरावे लागेल, असे बोलून सदर दंडाची रक्कम कमी करुन ७३हजार ६९८ रुपयांचा दंड केला. सदर दंडाची रक्कम कमी केल्याचा मोबदला म्हणून ४० हजार रुपये लाच रक्कमेची पंचसाक्षीदारासमक्ष सुस्पष्ट मागणी केली व आपले लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन स्वतःचे आर्थिक फायदयाकरीता वाम व भ्रष्ट मार्गाने सदर रक्कमेतील पहीला टप्पा रुपये २० हजार लाच स्विकारंताता रंगेहाथ मिळून आले. यावरुन गैरअर्जदार यांचे विरुध्द पोलीस स्टेशन, अहेरी येथे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु असून त्यांचे मौजा वरोरा, जिल्हा चंद्रपूर येथील निवासस्थानांची अॅन्टी करप्शन ब्युरो, चंद्रपूर टीमकडून झडती घेण्यात येत आहे.सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक राहुल माकणीकर, अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर, सचिन कदम, अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपूर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्रीधर भोसले, पो.नि. शिवाजी राठोड, सफ़ौ सुनील पेद्दीवार, पोहवा नथ्थु धोटे, राजेश पदमगिरवार, पोशि किशोर ठाकुर, संदीप उडान सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली व चापोना विक्रमजीत सरकार, मोपवि गडचिरोली यांनी केलेली आहे.

## वरोराचा व्हॉलीबॉल खेळाडू भारतीय तटरक्षक दलात

**वरोरा । प्रतिनिधी**

लोक शिक्षण संस्था वरोडा व वरोरा स्पोर्टस फाउंडेशन वरोरा चा राष्ट्रीय वॉलीबॉल खेळाडू नयन प्रदीप वरखडे यांची भारतीय तटरक्षक दल पांडिचेरी येथे सहाय्यक कमांडंट पदावर नियुक्ती झालेली आहे. नयन हा व्हॉलीबॉल चा उत्कृष्ट खेळाडू असून आपल्या मेहनतीच्या जोरावर भारतीय तटरक्षक दलात असिस्टंट कमांडंट म्हणून स्थान पटकाविले.

यापूर्वी सुद्धा वरोरा स्पोर्ट फाउंडेशन वरोरा व लोक शिक्षण संस्था वरोडाचे खेळाडू शासकीय नोकरीत लागले असून दरवर्षी शालेय व संघटना गटात येथील खेळाडू राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करतात ही विशेष बाब.नयनच्या नियुक्तीचे वरोरा शहरात सर्वत्र कौतुक करण्यात येत असून, आपले श्रेय लोक शिक्षण संस्था वरोडा चे अध्यक्ष प्रा. श्रीकांत पाटील, उपाध्यक्ष उपाध्यक्ष श्रीकृष्ण घड्याळ पाटील, कार्यवाह विश्वनाथ जोशी, ड. दुष्यंत देशपांडे, वरोरा स्पोर्ट्स




फाउंडेशनचे अध्यक्ष गजानन जीवतोडे,ज्येष्ठ मार्गदर्शक सुनील बांगडे , वरिष्ठ खेळाडू मुकुल कातांगडे, देवानंद डुकरे, विनोद उमरे, सागर कुरेकार, संजय अंबुलकर, अनिल घुबडे, निखिल बोबडे गणेश मुसळे, दुष्यंत लांडगे, उत्तम देऊळकर, वडील प्रदीप वरखडे व आई सविता वरखडे यांना देतात.

# झ्यामरावजी लांबट गुरूजी

**विपरीत परिस्थितीवर मात करीत ग्रामीण भागातून शिक्षण घेतलेले यवतमाळ जिल्ह्यातील दांडगाव येथील रहिवासी झ्यामरावजी लांबट गुरुजी हे आज वयाची ८६ वर्षे पूर्ण करीत आहेत. कठोर परिश्रम आणि दुर्दम्य इच्छाशक्तीच्या भरोशावर माणूस काय करू शकतो? हे त्यांनी स्वत:च्या कर्तृत्वातून सिद्ध केले आहे. लांबट गुरुजी हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान आहेत.**




यवतमाळ जिल्ह्यातील दांडगाव (मुकटा) या छोट्याशा गावात झ्यामरावजी बाजीरावजी लांबट गुरूजी यांचा १८ ऑक्टोबर, १९३७ यावर्षी जन्म झाला. भौतिक सोयी सुविधांपासून वंचित असलेल्या या लहानशा खेड्यात वडील बाजीरावजींचा शेती व्यवसाय होता. शेतकरी कुटुंब, जेमतेम आर्थिक परिस्थिती असे सर्वसामान्य शेतकरी परिवारातील चित्र बाजीरावजींच्या घरातही होते. ते स्वतः निरक्षर असले तरी आपल्या मुलाने शिकून मोठे व्हावे असे त्यांना वाटतं. दांडगांव येथील गावकऱ्यांवर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि गाडगे महाराजांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. गावात दररोज संध्याकाळी नित्यनेमाने सामूहिक प्रार्थना व्हायची. या प्रार्थनेतून छोट्या बालकांची वैचारिक जडणघडण घडत गेली. स्वाभाविकपणे बाजीरावजींच्या परिवारावरही या महामानवांच्या विचारांचा प्रभाव होता. शिक्षणाचे महत्त्व त्यांना कळत गेले. आर्थिक चणचण सोसत मुलांसाठी ते पुस्तकांची व्यवस्था करीत. बालपणी गावातील सार्वजनिक प्रार्थनेत जाऊनजाऊन पुस्तकांप्रती आपुलकी निर्माण झाल्यावर गुरूजींनी पुस्तकांना जवळ केले. दांडगाव येथून ५ किलोमीटर अंतरावर असलेल्या हिवरा (मजरा) या गावातील शाळेत प्रवेश घेतला. हिवरा या गावात जायला रस्ता नसल्यामुळे शेताच्या धुऱ्यावरून पायदळ जावे लागायचे. मार्गावरील दोन नाल्यांचा पावसाळ्यातील त्रास सोसत, अनवाणी पायात काटे टोचीत प्राथमिक शिक्षण पूर्ण झाले. पुढील शिक्षणाची व्यवस्था हिवरा गावात नसल्यामुळे त्यांनी वरोरा येथील हिरालाल लोया हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेतले. पुढे शिकविण्याची घरच्या लोकांची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे त्यांना नियमित शिक्षणाला रामराम ठोकावा लागला. तरीही त्यांनी मनातील शिक्षणाची जिद्द सोडली नाही. शिक्षणाने माणूस मोठा होतो हा मंत्र त्यांच्या मनात कायमचा कोरला गेल्यामुळे काही का असेना आपण आपले शिक्षण पूर्ण केलेच पाहिजे यासाठी त्यांनी जीवाचे रान केले. इच्छाशक्ती पुढे मार्ग निघतोच.पुढे कोणीतरी त्यांना शिक्षणासाठी खाजगी शिक्षणाचा पर्याय सुचवला. हायर मॅट्रिक ते पदवीपर्यंतचे शिक्षण गुरुजींनी खाजगीरीत्या परीक्षा देऊन पूर्ण केले. शिक्षण घेत असताना साने गुरुजींची काही पुस्तके वाचनात आली होती. ध्येयवेढ्या साने गुरुजींच्या पुस्तकाचे वाचन करून आपणही गुरुजींसारखे शिक्षक व्हावे हा विचार मनात जागृत झाला. शिक्षक होण्यासाठी लागणारी बी.एड. ही शिक्षणशास्त्रातील पदवी त्यांनी मिळविली. १९५७ या वर्षी जनपद शाळेतून शिक्षकी पेशा स्वीकारला. पुढे १९६७ मध्ये नगर परिषद क्षेत्रांतर्गत येणाऱ्या प्रायमरी शाळेत शिक्षक म्हणून रुजू झाले. १९९५ ला रेल्वे स्टेशन परिसरातील भारतभूषण मालवीय विद्यालयातून मुख्याध्यापक या पदावरून सेवानिवृत्त झाले. साधारणतः कर्मचारी माणसे सेवानिवृत्तीनंतर शांत जीवन जगण्याचा प्रयत्न करतात. परंतु धडपड्या स्वभावाच्या गुरुजींना सेवानिवृत्तीनंतर जीवन शांतपणे घालविणे



आवडले नसावे. दुसऱ्यांसाठी काहीतरी केले पाहिजे.त्यात आपलेही योगदान असावे या हेतूने त्यांनी वरोरा शहरातील विविध सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक संस्थांशी स्वतःची नाळ जोडून घेतली. जमेल तसे त्यात स्वतःला गुंतवून घेतले. आज वयाची ८६ वर्षे उलटली तरी या वयोवृद्ध तरुणाची धडपड इतर तरुणांना लाजविणारी आहे. ते दररोज पहाटे ५ वाजता उठून योगासने व किरकोळ व्यायाम नियमितपणे आजही करतात. शेगावचे संत गजानन महाराज हे त्यांचे श्रद्धास्थान आहे. दररोज सकाळी घरासमोरील संत गजाननाच्या मूर्तीची सेवा ते करतात. नियमितपणे शेगावला सहकुटुंब वारी करत असतात. स्वतःच्या आर्थिक उत्पन्नातून स्वतंत्र खोली उभारण्यासाठी त्यांनी शेगाव संस्थानला आर्थिक योगदान दिलेले आहे. त्यांची संत गजानन महाराजांवर असीम श्रद्धा आहे. आपल्या घरासमोरील अंगणात महाराजांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त दरवर्षी नियमितपणे ते घरी महाप्रसादाचा कार्यक्रम ठेवतात. मनमोकळ्या व बडबड्या स्वभावाने परिचित व नवख्या लोकांच्या अंतःकरणात पोहचण्याची किमया गुरुजींना साध्य झाली आहे. समोरच्याशी बोलताना कौटुंबिक आणि व्यक्तिगत जीवनाविषयी चर्चा करत ते कधी हृदयात पोहोचतात हे समोरच्यालाही कळत नाही. स्वतः ग्रामीण भागातून शहरात स्थायिक झाल्याने ग्रामीण भागातील इतरांनीही आपल्याप्रमाणे स्वतःची प्रगती करून घ्यावी असे त्यांना वाटते. गावाकडील माणसे भेटली की त्यांना आवर्जून घरी घेऊन जाणे हा त्यांचा स्थायीभाव आहे. गाव सोडून अनेक वर्षे झाली असलीतरी गावातील लहान मुलांपासून तर मोठ्यांपर्यंत सगळ्यांना नावासहित ओळखण्यात गुरुजींचा हातखंडा आहे. आयुर्विमाच्या माध्यमातून त्यांनी जनसंपर्क वाढविला. विमा अभिकर्ता म्हणून काम करत ४० वर्षाच्या काळात जवळपास ६००० च्या वर विमा पॉलिसी काढून त्यांनी एलआयसीमध्ये करोडपती बनण्याचा सन्मान प्राप्त केलेला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात समाजातील लोकांच्या पॉलिसी काढून त्यांनी एकप्रकारे आपल्या दांडग्या जनसंपर्काचा परिचय दिलेला आहे. सतत बोलत राहणे ह्या गुरूजींचा स्वभाव, बोलण्यातून इतरांच्या समजून घेणे हा त्यांचा धर्म. विदर्भामध्ये सुप्रसिद्ध असलेल्या विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट), वरोरा या शैक्षणिक संस्थेचे अनेक वर्षे ते कोषाध्यक्ष होते. महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष ड. मोरेश्वरराव टेमुर्डे यांचे निकटवर्तीय सहकारी म्हणून त्यांची प्रतिमा आहे. सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघ व कुटुंब वेतनधारक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष व सचिव पद त्यांनी भूषविले आहे. प्रगती शिक्षण संस्थेचे सचिव, लाइफ इन्शुरन्स एजंट असोसिएशन नागपूर डिव्हिजनचे अध्यक्ष म्हणून ५ वर्षे कार्यभार त्यांनी सांभाळायला आहे. या समितीत सल्लागार म्हणून कार्यरत होते. अरविंद सेंटर वरोरा चे सदस्य, विदर्भ नगरपरिषदेच्या पूर्व विभागाचे सचिव अशा अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळत त्यांनी आपले सामाजिक दायित्व निभावले आहे. विविध अष्टपैलू स्वभावाचे धनी असलेल्या गुरुजींनी आज वयाची ८६ वर्षे पूर्ण केली आहे. संकटकाळ आणि विपरीत परिस्थितीतही माणसे जोडून ठेवण्याचे कौशल्य लाभलेल्या गुरुजींना निरोगी व निरामय आरोग्य लाभो अशी या निमित्ताने शुभकामना व्यक्त करतो.

# स्थित्यंतरातील वाहने नि आव्हाने

हळूहळू पण निश्चितपणे जग बॅटरीवर चालणारी वाहने वापरू लागले आहे. जगभरात सर्व वाहनकंपन्या आपापले पेट्रोल- डिझेल इंजिनकडून विजेवर चालणाऱ्या इंजिनचे नियोजन जाहीर करत आहेत. भारतही या बदलामध्ये मागे नाही. सर्व मोठ्या भारतीय कंपन्या आपल्या विजेवरील चारचाक्या आणि दुचाकी वाहने उत्पादन करू लागल्या आहेत.एवढेच नव्हे तर भारतीय ग्राहकांमध्ये ही वाहने लोकप्रियही आहेत. कदाचित पेट्रोलच्या वाढत्या किमतींमुळे की काय; पण भारतात वाहनक्षेत्रातील ‘हरितक्रांती’चे मुख्य कारण ग्राहकांकडून असलेला उत्तम प्रतिसाद असल्याचे मानले जाते.२०२२-२३ मध्ये या विजेवरच्या गाड्यांचे उत्पादन मागील वर्षीपेक्षा १५५ टक्क्यांनी वाढून १७ लाख झाले आहे. भारतीय वाहनउद्योग २०३० पर्यंत विषारी वायूउत्सर्जन ४५ टक्क्यांनी कमी करण्याच्या ध्येयाकडे आगेकूच करत असतानाच या बदलामुळे झलेल्या तंत्रज्ञानविकासाचा परिणाम वाहन दुरुस्तीक्षेत्रातल्या अनेक लघु उद्योग आणि सूक्ष्म सेवांवर होणार आहे.सध्या वाहनउद्योगाशी संबंधित नानाविध उद्योग लघु-सूक्ष्म उद्योगक्षेत्रात रोजगार निर्माण करत आहेत. पुण्याच्या आजूबाजूला गाडीतील प्रत्येक भाग तयार करून बजाज, टेल्को इत्यादी मोठ्या कंपन्यांना पुरवणारी हजारो लघु- सूक्ष्म उद्योगांची पुरवठासाखळी आहे.भारतात या क्षेत्रात परदेशी गुंतवणूक येत आहे; परंतु



सध्यातरी विजेच्या गाड्यांसाठी लागणारे बहुतेक भाग हे व्हिएतनाम, चीन, जर्मनी इत्यादी देशांमधून आयात केले जातात. लौकरच या आयातीची जागा भारतात परदेशी गुंतवणुकीच्या साहाय्याने बनवलेली उत्पादने घेतील.जसजशी परंपरागत वाहनांची जागा विजेवर चालणारी वाहने घेऊ लागतील, तसतशी वाहनउद्योगावर आधारित जुन्या भागांची आणि ते बनवणाऱ्या लघुउद्योगांसाठीची मागणी कमी होऊ लागेल. या परिस्थितीला या लघु उद्योगांनी कसे सामोरे जावे, याचे ठोस नियोजन कोणत्याही प्रकारे झाल्याचे दिसत नाही.सेवाक्षेत्रात गाडीमध्ये हवा भरण्यापासून, तेल पाणी करणे, इंजिनाचे विविध भाग पुरवणे या व्यवसायांमधील गॅरेज मेकॅनिक आहेत. त्यांच्या सेवांसाठीची मागणीदेखील कमी होऊ लागेल. एकदा मॅकेनिकाकडे गेल्यावर गिअर बॉक्समधले तेल बदलणे, आरसा घट्ट करणे, ब्रेककेबल बदलणे अशा प्रकारची विविध कामे निघून मॅकेनिक रोजगार मिळवत असे.आता नवीन वाहनांमध्ये तेल बदलणे, यासारखी कामे निघणारच नाहीत. एकीकडे जुन्या व्यवसायांवर गदा येण्याची भीती तर दुसरीकडे विजेच्या गाड्यांसाठी योग्य मॅकेनिक मिळणे दुरापस्त अशी परिस्थिती सध्या अमेरिका-ब्रिटनसारख्या काही पाश्चात्य देशांमध्ये दिसते.या नवीन गाड्या दुरुस्त करण्यासाठी जी विशिष्ट साधने लागतात, त्यासाठी पैसे ओतणे या व्यावसायिकांना परवडत नाही. भारतातही ‘बॅटरीवरच्या गाडीला हात लावणार नाही’ असे सांगण्यात येते, त्यामुळे नवीन विजेवरची गाडी घेतली तर नेहमीच्या कोपऱ्यावरच्या जुन्या गॅरेजमध्ये सोडता येत नाही.सरकार या नव्या ‘हरितक्रांती’वर भर देऊन विजेवरील वाहनांसाठी परदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन देत आहे. ग्राहकांनाही बऱ्याच राज्यांमध्ये विविध करांमधून सूट देण्यात आली आहे. परंतु विजेच्या गाड्या दुरुस्त करण्याचे प्रशिक्षण दुर्मिळ आहे.कारण काही राज्यांत सरकारने दोन वर्षांचा अभ्यासक्रम तयार केला आहे. या क्षेत्रात नव्याने येणाऱ्या तरुणांसाठी तो उपयोगी पडेल. पण जे लाखो लोक परंपरागत वाहनदुरुस्ती करताहेत त्यांच्या भवितव्याचे काय?देश प्रगतिपथावर असताना स्थित्यंतरे अटळ असतात; पण त्यातून आर्थिक विषमता तीव्र होऊ न देण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत. लघु- सूक्ष्म उद्योग व गॅरेज व्यवसायिक यांनी या स्थित्यंतराला सामोरे जाण्यासाठी काय करावे. त्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण त्यांना दिल्यास मोठ्या प्रमाणावर बेरोजगारीत भर पडण्यापासून देश वाचू शकेल..

# मानकऱ्यांच्या घरी पलंगाचे भव्य स्वागत

**अहमदनगर । प्रतिनिधी**

मधील सबजेल चौकातील तुळजाभवानी मातेच्या मंदिराचे मुख्य पुजारी असलेले व पलंगाचे मानकरी पलंगे यांच्या येथे पलंगाचे भव्य स्वागत व पूजा करण्यात यावेळी बाबुराव पलंगे,अनंत पलंगे,गणेश पलंगे,उमेश पलंगे सह भाविक मोठ्या संख्नेने उपस्तित होते. पलंगे कुटुंब मानकरी असलेल्या व सुमारे ८०० वर्षाची परंपरा असलेल्या श्री तुळजाभवानी मातेच्या पलंगाचा प्रवास हा खूप थक्क करणारा आहे श्री.तुळजाभवानी मातेचा पलंग हा बनविण्याचा मान मूळचे घोडेगाव (भिमाशंकरजवळ) असणारे ठाकूर (कातारी) कुटुंबियांना आहे.पलंगाचे कातीव कामासाठी आंब्याचे आणि सागवान लाकुड, रंगकाम कामाकरिता लाखाचे रंग, लोखंडी साहीत्य खिळे पट्टी,सुती नवार पट्टी,दोरखंड,गादीसाठी कापुस,छताकरिता कापड तसेच इतर लागणारे सर्व काही साहित्य ही जबाबदारीने अहमदनगर येथील पलंगे (तेली) घराण्याकडुन ठाकूर कुटुंबियांना पुरवले जातात.पलंग घोडेगाव मध्ये बनवून पूर्ण झाल्यावर त्याच्यावर दोरखंडाची बांधणी पलंगे कुटुंबियांकडून केली जाते आणि मग तो पलंग पुणे जिल्ह्यात फिरून नगर जिल्ह्यात आला श्री तुळजाभवानी मातेचा पलंग खांद्यावर डोक्यावर वाहून पायी तुळजापूरला नेण्याची परंपरा आहे. नगरमधून श्री तुळजाभवानी मातेचा पलंग बीड जिल्हा,सोलापूर जिल्हा आणि उस्मानाबाद जिल्हा असा नवरात्रीची तिसरी माळ ते नवरात्राची नववी माळ अशी ७ दिवस २४ तास म्हणजे दिवस-रात्र प्रवास करत असतो.नगरलगत असणारी लोणी सय्यदमीर, कुंटेफळ, चिंचोडी पाटील,कुंडी या चार मानाच्या गावचे भक्त पलंगासोबत सेवा करण्याचे काम करत असतात.महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांत तुळजाभवानीचे स्थान अतिशय वेगळे असून मंदिरातील वेगवेगळ्या प्रथा-परंपरा पाहिल्यास शेकडो वर्षांपासून चालत आलेले रीतीरिवाज आजही कायम आहेत. दळणवळणाची कुठलीही साधने उपलब्ध नसताना पूर्वीच्या काळी देवीच्या मानक-यांनी किती कष्ट घेतले असतील याची कल्पना





करू शकत नाही. पलंग, पालखी, बुधलीवाले, भुते, माया प्रताप, बोंबले यासारखी मंडळी नगर, पुणे, नाशिक, सोलापूर यांसारख्या दूरदूरच्या भागातून येऊन आपल्या सेवा आजही अखंडपणे बजावत असतात. विशेष म्हणजे सर्वांची जगन्माता आई तुळजाभवानी ज्या पालखीत बसून मिरवते व ज्या पलंगावर निद्रा घेते ते तयार करणारे हात एवढे छोटे आहेत की सर्वसामान्यांना काय पण मंदिर प्रशासनालाही त्यांच्या नावाची साधी कल्पनाही नाही. त्याचे कारण म्हणजे सेवा बजावण्याच्या मानपानातील असणारी गुंतागुंत. तसे पाहिल्यानंतर देवाचा पलंग असो की पालखी या दोन्ही धार्मिकदृष्ट्या पवित्र असल्याने आपण कुठल्याही मंदिरात गेलो तर वापर झाल्यानंतर त्या वस्तू मंदिरातच कुठे तरी व्यवस्थितपणे सांभाळून ठेवून पुन्हा त्याचा वापर केला जातो. याच्या उलट तुळजाभवानी मंदिरातील पलंग आणि पालखीचे वैशिष्ट्य म्हणजे या दोन्ही वस्तू एकदा वापर झाल्या की त्या सन्मानपूर्वक तोडून होमात टाकून जाळून टाकल्या जातात. तसं पाहिलं तर तुळजाभवानीच्या सर्वच प्रथा आणि परंपरा इतर देवस्थानांपेक्षा अतिशय भिन्न आहेत. कारण हिंदू धर्मात तुळजाभवानीच्या मूर्तीशिवाय इतर कुठलीही मूर्ती नसेल जी प्रत्यक्षपणे काढून मूळ मूर्तीलाच पालखीत ठेवून मंदिराभोवती प्रदक्षिणा घातली जाते. शिवाय वर्षातून तीन वेळा मूळ मूर्तीला सिंहासनावरून काढून पलंगावर झोपविली जाते. तुळजाभवानीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तुळजापूरमध्ये तेलाचा घाणा पूर्वापारप्रमाणे चालवायला परवानगी नाही. तर आश्चर्याची बाब म्हणजे याच तुळजाभवानीला लागणारा पलंग आणि पालखी घेऊन येण्याचा मान नगर जिल्ह्यातील तेल्याचा आहे. आपण तुळजाभवानी मंदिरातील मुख्य गाभा-यात गेल्यानंतर उजव्या हाताला एका ओवरीत देवीचा पलंग दिसतो. त्या पलंगावर देवीची मूळ मूर्ती काढून भाद्रपद वद्य अष्टमी ते अमावास्या, अश्विन शुद्ध एकादशी ते पौर्णिमा व पौष शुद्ध प्रतिपदा ते अष्टमीपर्यंत झोपविली जाते. याला देवीची घोर निद्रा, श्रमनिद्रा व भोग निद्रा म्हटली जाते. तर सीमोल्लंघनासाठी तीच मूर्ती पालखीत ठेवून मुख्य मंदिराभोवती मिरविली जाते. विशेष म्हणजे पालखी सीमोल्लंघनानंतर लगेचच तोडून होमात टाकली जाते. तर दस-यानंतरच्या पौर्णिमेदिवशी जुना पलंग होमात टाकून नवा पलंग ठेवला जातो. तुळजापुरातील मराठा समाजातील एका घराण्याकडे या पलंगाची सेवा करण्याची परंपरा असल्याने त्याचे आडनाव पलंगे पडले आहे. पलंग व पालखी या दोन्ही वस्तू देवीसाठी महत्त्वाच्या असल्या तरी त्या आणण्याचा मान हा अहमदनगरच्या तेली समाजाचा आहे. यातही पुन्हा वेगळेपण म्हणजे तेली मानकरी असले तरी त्या वस्तू भलत्याच जागी तयार होऊन कशाप्रकारे तुळजापूरपर्यंत पोहोचतात हा सर्व प्रवासच अनोखा. तुळजाभवानी देवीचा पलंग घेऊन येण्याचा मान परंपरेने अहमदनगर शहरातील तेली समाजातील पलंगे घराण्याला आहे. सध्या बाबूराव आंबादास पलंगे याचे मुख्य मानकरी असून नगर शहरातील तुळजाभवानी मंदिराचे ते पुजारी आहेत. तुळजापूरप्रमाणे इथेही भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. देवीचा पलंग तुळजापूरला घेऊन येण्याचा मान भलेही पलंगे घराण्याला असला तरी तो तयार करण्यासाठी राबणारे हात दुसरेच आहेत. प्रत्यक्षात देवीचा पलंग तयार करण्याचे काम पुणे जिल्ह्यातील घोडेगाव येथील ठाकूर घराणे परंपरेने करत असते. श्रद्धापूर्वक पलंग तयार करून दिल्यानंतर पुन्हा ठाकूर यांचे काम संपले. बिचारे तुळजापुरात आल्यानंतर त्या पलंगापर्यंत जायचे म्हटले तर त्याला परवानगी नाही. कारण पलंग तयार केल्यानंतर तो नगरच्या पलंगे नावाच्या तेली समाजातील मानक-याच्या ताब्यात देतो. तेथून तो तुळजापूरच्या दिशेने रवाना होतो. घोडेगावावरून वाजत-गाजत पलंगाचा प्रवास महिनाभर सुरू असतो. या दरम्यान तो जुन्नर, नारायणगाव, आळेफाटा, पारनेरमार्गे नगरपर्यंत प्रवास करत असतो.

## अँड.श्रीपतराव शिंदे यांच्या निधनाने जनता दलाची मोठी हानी-प्रदेशाध्यक्ष शेवाळे

**पुणे । प्रतिनिधी**

जनता दलाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व माजी आमदार श्रीपतराव शिंदे यांचे पुणे येथे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांनी आयुष्यभर समाजवादी व पुरोगामी विचार जोपासला. शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी जनता दलाची साथ सोडली नाही. त्यांना आदरांजली वाहण्यासाठी जिल्ह्यातून व महाराष्ट्रातून जनसागर लोटला होता.गडहिंग्लज येथील भडगावच्या डॉ. ए. डी. शिंदे शिक्षण संकुलाच्या आवारात उभारलेल्या चौथऱ्यावर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार झाले. ज्येष्ठ कन्या डॉ. रचना थोरात व गडहिंग्लजच्या माजी नगराध्यक्ष स्वाती कोरी यांनी त्यांच्या चितेला अग्नी दिला. यावेळी जनता दलाचे प्रदेशाध्यक्ष नाथाभाऊ शेवाळे बोलताना



म्हणाले, गडहिंग्लज मतदार संघाचे प्रतिनिधित्व करत असताना मा.आ.श्रीपतराव शिंदे यांनी विधान सभेत शेतकरी, कष्टकरी, कामगार,बेरोजगार,या घटकाला न्याय मिळावा म्हणून सातत्याने आवाज उठवला. विधान सभेत त्यांची अत्यंत स्पष्ट वक्ता आमदार म्हणून ओळख होती. पक्षाशी शेवटपर्यंत एकनिष्ठ राहून शेवटपर्यंत पक्षनिष्ठा जोपासली. जिल्ह्यातील व राज्यातील अनेक महत्त्वाच्या पदावर असताना त्यांनी उल्लेखनीय काम केले.त्यांच्या जाण्याने त्यांचे कुटुंबीय नव्हे तर जनता दल पोरका झाला आहे. सामान्य कार्यकर्यकर्त्यांना मा.आ.श्रीपतराव शिंदे यांनी बळ दिले असून सच्चा सहकारी गमावल्याची भावना माजी पंतप्रधान व पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष एच. डी. देवेगौडा यांनी व्यक्त केली. यावेळी पालकमंत्री हसन मुश्रीफ,माजी मंत्री भरमू पाटील, माजी आमदार संजय घाटगे, माजी आमदार संध्यादेवी कुपेकर, मा.आ.प्रा. शरद पाटील, सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे, तहसीलदार ऋषिकेत शेळके,माजी नगराध्यक्षा स्वाती कोरी यांच्यासह शिंदे कुटुंबीय, सर्वपक्षीय कार्यकर्ते, नागरिक सहभागी झाले होते.

## पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे ४३ वे राष्ट्रीय अधिवेशन नागपुरात

**मुंबई । प्रतिनिधी**

विविध सामाजिक आणि राजकीय प्रश्नांना घेऊन .येत्या सोमवारी २३ ऑक्टोबरला नागपूर येथे पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे ४३ वें राष्ट्रीय अधिवेशन होणार.असल्याची माहिती पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी आज मुंबईत दिली. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पावन पर्वावर अशोक विजय दशमीच्या पूर्वसंध्येला हे अधिवेशन होणार असून विशाल संविधान सन्मान रलीचे काढण्यात येणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडणार आहे. पक्षाध्यक्ष प्रा. जोगेंद्र कवाडे हे या रैलीचे नेतृत्व करणार आहेत .देशभरातून जवळपास तीन हजार पदाधिकारी आणि प्रमुख कार्यकर्ते उपस्थित राहतील असे.ही.कवाडे यांनी




सांगितले. यावेळी पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष जय दीप कवाडे यांच्यासह दलितमित्र गोपाळराव आटोटे प्रा.नारनवरे, अड.ज क नारायणे गणेश उन्हवणे , पडघम गुरुजी आनिविजय वाघमारे विलास निकलेआदी कार्यकर्ते उपस्थित होते. या अधिवेशन दरम्यान गेरान जमिनी झोपडपट्टी पुनर्वसन आणि विकास , बार्टी प्रशिक्षण केंद्र ,खासगीकरण कंत्राटी नोकरभरती अट्रोसिटी या विषयांवर चर्चा केली जाईल.मी रिपब्लिकन अभियान आणि संविधान जागरण यात्रा हा पक्षाचा संकल्प असेल असे प्रा कवाडे यांनी सांगितले .

## स्व.गोपीनाथ मुंडे यांनी सतत म.फुले समता परिषदेला साथ दिली!

### अभिष्टचिंतन दिनी स्व. मुंडेसाहेबांच्या आठवणींनी ना.भुजबळ गहिवरले..

**आष्टी । प्रतिनिधी**

'लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे हे महाराष्ट्राची मुलुख मैदानी तोफ, हिंदुस्थानचे लोकप्रिय व्यक्तिमत्व होते.त्यांचे बुद्धीकौशल्य प्रचंड लोकप्रियता आणि सर्वांना सोबत घेण्याची वेगळे हातोटी सर्वोत्कृष्ट होती असे सांगून स्व. गोपीनाथरावांनी महात्मा फुले समता परिषदेसाठी सदैव योगदान दिले एवढेच नाही तर ते सोबत राहून त्यांनी साथ ही दिली..!' अशा शब्दात आपल्या अभिष्टचिंतन दिनी बीड जिल्ह्याच्या आष्टी तालुक्याच्यावतीने समता परिषदेच्या माध्यमातून लोकनेते गोपीनाथ मुंडे आणि छगन भुजबळ यांचा एकमेकांना आलिंगन देतानाची भगवानगडावरील भव्य प्रतिमा भेट दिली. त्यावेळी आपल्या गहिवरल्या स्वरात ना. भुजबळ यांनी गोपीनाथरावजी मुंडे यांचे कौतुक करत मोठेपणा पुन्हा अधोरेखित केला!

निमित्त होते ना. छगन भुजबळ यांच्या अभिष्टचिंतन दिनाचे. राज्यभरातून ना. भुजबळांना अभिष्टचिंतन दिनाच्या निमित्ताने सत्कार शुभेच्छा आणि दीर्घायुष्यासाठी गाव वाड्या आणि जिल्हा, विभाग ,राज्य आणि देशभरातून प्रार्थना करण्यात आल्या.दरम्यान आष्टी तालुका समता परिषदेच्यावतीने ना.छगनराव भुजबळ यांना आज शुभेच्छा देऊन प्रत्यक्ष भव्य प्रतिमा प्रदान करण्यात आली त्यावेळी हा प्रसंग



अनुभवास आला.अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्याचे अन्न व नागरी ग्राहक संरक्षण मंत्री ना.छगन भुजबळ यांच्या ७६ व्या. वाढदिवसानिमित्त अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद आष्टी तालुक्याच्यावतीने त्यांना संत भगवानबाबा यांच्या भगवानगडावरील लोकनेते गोपीनाथ मुंडे आणि ना.छगन भुजबळ यांची गळाभेट असलेली प्रतिम सस्नेह भेट देऊन सत्कार केला.यावेळी तालुकाध्यक्ष दत्ताभाऊ बोडखे ,पदाधिकारी, समता सैनिक उपस्थित होते.यावेळी भुजबळ साहेबांनी तो फोटो पाहून जुन्या आठवणींना उजाळा देत गोपीनाथरावांनी नेहमी ओबीसींच्या प्रश्नावर आवाज उठवला आणि नेहमी महात्मा फुले समता परिषदेसोबत खांद्याला खांदा लावून काम केलं असे उद् गार काढले. यावेळी समता सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गोपीनाथरावांनी नेहमी ओबीसींच्या प्रश्नावर आवाज उठवला आणि नेहमी समता परिषदेसोबत खांद्याला खांदा लावून काम केलं असे भुजबळ साहेबांनी भावनिक आठवण काढत वाढदिवसादिवशी आठवणींना उजाळा दिला.**

## ग्रामसेवकाच्या बदलीसाठी वंचित बहुजन आघाडीचे आमरण उपोषण



**लोणार । प्रतिनिधी**

तालुक्यातील दाभा येथील ग्रामसेवक किशोर गणपत भाग्यवंत यांची तात्काळ बदली करून त्यांच्या किमकाजाची चौकशी करावी यासाठी वंचित बहुजन आघाडीचे रमेश विश्वनाथ प्रधान यांनी पंचायत समिती समोर दि.१६ आक्टोंबर रोजी उपोषण सुरू केले.दिलेल्या निवेदनात नमुद आहे की, मौजे दाभा येथे कार्यरत असलेले ग्रामसेवक किशोर गणपत भाग्यवंत हे प्रदिर्घ कालावधी पासुन दाभा येथे कार्यरत आहे ते मुख्यालयी हजर राहत नाही.दाभा येथे सार्वजनिक शौचालय व व्यायाम शाळा उभारण्यात येत आहे . बरेच दिवस होउन सुध्दा हे काम अर्धवट केलेले आहे.त्याकरीता मंजुर निधी मात्र पुर्ण खर्च केला कि काय अशी शंका येते.तसेच वैयक्तिक शौचालय नसलेल्या घरांना सुध्दा शौचालय आहे.असे गाव नमुना ८ ला दर्शवितात गावात काही विकास कामांची माहिती फलक लावत नाहीत.गाव नमुना ८ला नोंदि घेण्यासाठी हे महाशय १५ ते २० हजार रुपये मागणी करतात न दिल्यास कागदि घोडे नाचवून अर्जदाराच्या कामात व्यत्यय आणतात.तुमचे काम नियमात बसत नाही.अशी भीती दाखवतात.नियमानूसार ग्रामपंचायत च्या जमा खर्चाची नोंद योग्य वेळी होत नाही कॅशबुक आँनलाईन करत नाही नालीवरील सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावावी व ग्रामसेवक किशोर गणपत भाग्यवंत यांची तात्काळ बदली करावी या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने उपोषण सुरू केले आहे.

## विद्यार्थांनी घेतली इ-कचरा व्यवस्थापनाची प्रतिज्ञा

**वरोरा । प्रतिनिधी**

महारोगी सेवा समिती आनंदवन वरोरा द्वारा आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्न आनंद निकेतन महाविद्यालय आनंदवन वरोरा यांच्या वतीने १४ ऑक्टोबर आंतरराष्ट्रीय इ-कचरा दिन हा 'पर्यावरण आरोग्य सुरक्षा समिती च्या वतीने जनजागृती मोहीम राबवून साजरा करण्यात आला. सदर मोहीम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मृणाल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून इ-कचरा दिनाचे औचित्य साधून आनंदवनातील जिल्हा परिषद शाळा तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी इ-कचरा व्यवस्थापनाची प्रतिज्ञा घेतली.

विद्यार्थ्यांना तसेच शिक्षकांना सविस्तर माहिती समजाऊन सांगितली व विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करून इ-कचरा संकलन करण्यास प्रोत्साहित करण्यात आले. यावेळी इ-कचरा संकलन जनजागृतीच्या प्रमुख प्रा.



डॉ. संयोगिता वर्मा आणि ब. एस.सी (सी. बी. झेड.) द्वितीय वर्षांच्या विद्यार्थिनी युगा डोमकावडे, जानवी परचाके, तेजस्विनी काळे, अंकिता ताजने, साक्षी गायकवाड आणि एम.एस.सी. प्रथम वर्षाचे विद्यार्थी जुही लीचडे, शिवानी गोवरदिपे, विजय नन्नावरे, राकेश गिरडकर आणि विशाल चौधरी यांनी या दिवसाचे महत्व लक्षात घेऊन इ-कचरा यामधे येणाऱ्या वस्तूंची माहिती देऊन त्याचे योग्य रीतीने विल्हेवाट न झाल्यास पर्यावरणावर होणारे परिणाम, ते संकलन करून महाविद्यालयात सुरू करण्यात आलेल्या इ-कचरा संकलन केंद्रातून त्याचे योग्य प्रकारे विल्हेवाट कशी लावतात याची संपूर्ण माहिती देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांना रियुस, रिड्युस आणि रिसायकल या त्रिसुत्रांचा वापर करून वाढत्या इ- कचऱ्याला रोखण्याचे आणि आपल्या परिसरातील इ-कचरा संकलन करण्याचे आव्हान विद्यार्थ्यांना करण्यात आले.

## बांधकाम कामगाराच्या ९०दिवसाच्या प्रमाणपत्रात अंबाजोगाई पंचायत समिती मध्ये सावळा गोंधळ

**बर्दापूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागातर्फे महाराष्ट्रातील बांधकाम कामगारांसाठी विविध योजना राबवल्या जात आहेत त्यात बांधकाम कामगार म्हणून शासनाकडे नोंद केल्यास त्या कामगारास महाराष्ट्र शासनातर्फे अनेक योजना मिळतात पण ग्रामीण भागातील बांधकाम कामगार म्हणून ९० दिवसाचे प्रमाणपत्र देण्याचा अधिकार ग्राम विकास अधिकारी यांना आहे पण उप मुख्य कार्यकारी अधिकारी बीड, यांनी आदेश देऊन सुद्धा ग्रामविकास अधिकारी ९० दिवसाचे प्रमाणपत्र देण्यास टाळाटाळ करत आहेत त्यासाठी आज अंबाजोगाई पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी काही दिवसात यासंबंधी चर्चा करून कायमस्वरूपी निर्णय घेऊ निर्णय घेऊ असे आश्वासन दिले. जर काही दिवसात याचा निर्णय नाही घेतला




तर बांधकाम कामगारांचे मोठे आंदोलन उभे करण्यात येईल. यावेळी उपस्थित बांधकाम कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष खाडे बर्दापूर ग्रामपंचायत चे ग्रामपंचायत सदस्य गजू पटेल लतीफ कुरेशी बर्दापूर संघर्ष समितीचे अध्यक्ष हनुमंत राजे तसेच फारूक आत्तार अनिल देवकते शेख मोईन अनेक कामगार संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते,

सह्याद्रीचा राखणदार



# खासदार अशोक नेते यांनी घेतला भामरागड तालुक्याचा आढावा

**भामरागड । प्रतिनिधी**

गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार तथा राष्ट्रीय महामंत्री भाजपा अनु. जनजाती मोर्चाचे अशोक नेते यांच्या अध्यक्षतेखाली भामरागड येथील शासकीय विश्राम सभागृहात तालुक्यातील विविध विभागाच्या प्रशासकिय अधिकाऱ्यांची आढावा बैठक पार पडली. यावेळी खासदारांनी उपस्थित प्रशासकीय अधिकाऱ्यांशी विविध महत्वपूर्ण विषयांसंदर्भात सविस्तर चर्चा करून आढावा घेतला आणि मार्गदर्शक सूचना दिल्या. या आढावा बैठकीला खासदार अशोक नेते यांनी विविध विभागाच्या अधिकाऱ्यांच्या कामाचा समाचार घेऊन,सुचना देत नागरिकांच्या कामात हयगय,अडथळा न करता त्यांच्या समस्या जाणून घेऊन,काम करावे.शासनाचे विकास काम असो किंवा शासनाच्या विविध कोणत्याही योजना असो यात दुर्लक्ष न करता अधिकाऱ्यानी कामे करावे, विद्युत महावितरण अधिकारी यांना निर्देश देत भामरागड हा अतिदुर्गम भाग असुन ग्रामिण भागात आपण लाईट बिल ची रिडींग न घेता सरसकट भरमसाठ लाईट बिल दिले जाते हि बाब निदर्शनास आली आपण अधिकारी



वर्गानी सतर्कता बाळगावी.आता यानंतर असे कुठल्याही प्रकारचे प्रकरण निदर्शनास आल्यास आपणांस जबाबदार ठरविले जाऊन कार्यवाही नोटीस देण्यात येईल.आशा सुचना यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. जे अधिकारी वर्ग कामचुकारपणा करतात त्यांची गय केली जाणार नाही,अशा सुचना अधिकाऱ्यांना खासदार अशोक नेते यांनी दिले.याप्रसंगी कृषी अधिकारी,आरोग्य अधिकारी, वनविभाग अधिकारी,(एम.एस.ई बी ) विद्युत महावितरण अधिकारी,पोलीस विभाग,बँक अधिकारी, महसुल विभाग, पाणी पुरवठा, सिंचाई,ग्रामसेवक असे विविध विभागाच्या अधिकाऱ्यांचा आढावा घेतला.या बैठकीला प्रामुख्याने मा. तहसिलदार पि.आर.पुप्पालवार, (बिडीओ) विस्तार अधिकारी स्वप्नील मगदुम,जिल्हा संघटन महामंत्री तथा प्रदेश कार्यकारिणी सदस्य रविंद्र ओल्लालवार, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष स्वप्नील वरघंटे, प्रकोष्ठ सहकार जिल्हा अध्यक्ष आशिष पिपरे,प्रकल्प अधिकारी प्रतिनिधी करपते, ता.कृषि. अधिकारी एम.एल. भावे,गटशिक्षणाधिकारी जनार्दन वडलाकोंडा,विद्युत महावितरण अधिकारी रोशन मानकर, महावितरण उपविभाग शशिकांत ढोले, पाणी पुरवठा अधिकारी अमोल रामटेके, महाराष्ट्र बँकचे अधिकारी प्रेम किनाके, नगराध्यक्षा रामबाई महाका (हलदार )भामरागड चे भाजपा नेते तथा ,स्वीकृत नगरसेवक सुनिल बिशवास, शहराध्यक्ष सम्राट मलिक, तपेश हलदार, माजी नगरसेवक प्रा.चालुरकर, दलसु सळमेक, दिलिप उईके,व इतर सर्व विभागाचे अधिकारी आणि भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# विकसित राष्ट्रासाठी माझी माती माझा देश अभियानाअंतर्गत अमृत कलश यात्रा संपन्न- जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर

**हिंगोली । प्रतिनिधी**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमाच्या समारोपीय उपक्रमांअंतर्गत मिट्टी को नमन, वीरो को वंदन करण्यासाठी मेरी मिट्टी मेरा देश अभियान संपूर्ण देशात राबविण्यात येत आहे. मेरी माती मेरा देश अर्थात माझी माती माझा देश अंतर्गत कलश यात्रा काढून देशाला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनविण्याच्या उद्देशाने व आपले हक्क आणि अधिकार, कर्तव्याची अंमलबजावणी आणि आपल्या देशावर, मातीवर प्रेम करावे या उद्देशाने हा उपक्रम देशातील सर्व नगरपालिका क्षेत्रातून, गावागावातून राबविण्यात येत आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी केले. जिल्ह्यातील पाचही नगरपालिका व नगर पंचायतीने संकलित केलेली माती अमृत कलशाची आज जिल्हाधिकारी कार्यालय ते गांधी चौका ते जिल्हाधिकारी कार्यालय अशी रथ यात्रा काढून जिल्हाधिकारी कार्यालय येथे अमृत कलश यात्रेचा समारोप करण्यात करण्यात आला. संकलित केलेली माती एका कलशा मध्ये टाकून पाचही नगर पालिका व नगर पंचायतीचे अमृत कलश जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर व जिल्हा प्रशासन अधिकारी अनंत जवादवार यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. 'मेरी माटी, मेरा देश अर्थात माझी माती, माझा देश' अभियान अंतर्गत जिल्ह्यातील माती दिल्ली येथे अमृत वाटिका निर्मितीसाठी वापरली जाणार आहे.जिल्ह्यातील पाचही नगरपालिका व नगर पंचायतीचे अमृत कलश हिंगोली नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक तसेच औंढा नगर पंचायतचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे, वसमत आणि कळमनुरी नगर परिषद मुख्याधिकारी आशुतोष चिंचाळकर, सेनगाव नगर पंचायतचे मुख्याधिकारी जोशी यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आले. हे अमृत कलश हिंगोली नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी उमेश हेंबाडे व अंकुश जाधव हे दिल्लीला घेऊन जाणार आहेत.स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमाच्या समारोपीय उपक्रमांअंतर्गत मेरी मिट्टी मेरा देश (मिट्टी को नमन,वीरो को वंदन हे अभियान संपूर्ण देशात राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार पाचही नगर परिषद व नगर पंचायतीने विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. या अभियानाचा मुख्य उद्देश हा प्रत्येक राज्यामध्ये गाव ते शहरापर्यंत आपल्या मातीविषयी जनजागृती,




प्रेम आणि साक्षरता निर्माण व्हावी. या मातृभूमीसाठी झटणारे तसेच त्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शूरविरांचा सन्मान व्हावा यासाठी या अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. यामध्ये जिल्ह्यातील हिंगोली, वसमत, कळमनुरी नगर परिषद आणि औंढा नागनाथ व सेनगाव येथील नगर पंचायतीने आझादी का अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मेरी माटी मेरा देश या उपक्रमअंतर्गत अमृत कलश यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. ही अमृत कलश यात्रा संपूर्ण हिंगोली जिल्ह्यात मागील एक महिन्यापासून वार्डा-वार्डात जाऊन घराघरातील माती अथवा तांदूळ संकलित करीत होती. या उपक्रमाचा उद्देश असा की प्रत्येक नागरिकाच्या मनात आपल्या माती विषयी व देशाबद्दल प्रेम उत्पन्न व्हावे, आपली संस्कृती जोपासली जावी, गुलामगिरीची मानसिकता नष्ट व्हावी या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हिंगोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण हिंगोली शहरातील संपूर्ण १६ वार्डामधून कलश यात्रा काढून नागरिकांमार्फत माती व तांदूळ कलशा मध्ये टाकून मोठ्या प्रमाणात संकलित करण्यात आले होते. ही अमृत कलश यात्रा दि. ११ सप्टेंबर ते १६ सप्टेंबर २०२३ पर्यंत हिंगोली शहरात सुरु होती. यामध्ये संपूर्ण हिंगोली शहरातील नागरिकाने मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देऊन आपला सहभाग नोंदविला. त्याचप्रमाणे वसमत, कळमनुरी, औंढा नागनाथ व सेनगाव नगर परिषद आणि नगर पंचायत यांनी सुद्धा अमृत कलश यात्रा काढली होती. यावेळी संकलित केलेली उर्वरित माती ही नगर परिषदेमार्फत तयार करण्यात आलेल्या वसुधा वंदन अमृत वाटिकेतील वृक्षांना अर्पित करण्यात आली. यावेळी उप मुख्याधिकारी उमेश हेंबाडे, नगर अभियंता रत्नाकर अडसिरे, प्रशासकीय अधिकारी श्याम माळवटकर, कार्यालयीन अधीक्षक देविसिंघ ठाकूर, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, आशिष रणसिंगे, गजानन कदम, संतोष मेंडके यांच्यासह हिंगोली, वसमत, कळमनुरी, औंढा नागनाथ व सेनगाव येथील नगर परिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# खेमजई येथे सेंद्रिय खत निर्मितीवर प्रात्याक्षिक

**वरोरा । प्रतिनिधी**

ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत महारोगी सेवा समिती द्वारा संचालित व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोलाशी संलग्नित वरोरा येथील आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी खेमजई येथे शेतकऱ्यांना कंपोस्ट खत निर्मितीच्या वेगवेगळया पद्धती पटवून दिल्या व बंगलोर पद्धतीनुसार खत निर्मितीची प्रक्रिया प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आली.

काडीकचरा, जनावरांचे मलमूत्र, पिकाचे उरलेले अवशेष तसेच बांधावरील पानगळ इत्यादी अवशेषांचे जिवाणूच्या सहयोगाने कुजून तयार केलेले खत म्हणजे कंपोस्ट खत.कंपोस्ट खताचा उपयोग जमिनीत केल्यास जमीन सजिव होऊन जमीनचे आरोग्य सुधारते . तसेच जमिनीत महत्त्वाच्या अन्नद्रव्याचे संतुलन व संतुलित पुरवठा करण्यास मदत होते. पिकांची जोमाने वाढ होऊन उत्पादनात वाढ होते.




कंपोस्ट खतामुळे जमिनीतील सेंद्रिय पदार्थाचे प्रमाण वाढते. त्यामुळे जमिनीची सुपीकता टिकवून सूक्ष्म जिवाणूंची संख्या वाढते. उपलब्ध अन्नद्रव्यांचे प्रमाण वाढते.कंपोस्ट खतामुळे भारी जमिनीत पाणी मुरण्याचे प्रमाण वाढते. त्यामुळे मातीची धूप कमी होते. हलक्या जमिनीत ओलावा जास्त काळ टिकून राहतो.हा कार्यक्रम यशस्वीरीता पार पाडण्यासाठी आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एस. पोतदार, कार्यक्रम प्रभारी डॉ.आर.वी. महाजन, कार्यक्रम समन्वयक डॉ. एस. एन.पंचभाई व विषय विशेषज्ञ एस. पी.वाघ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या कार्यक्रमात वैभव बदखल,यश देशमुख, वैभव विरूटकर, ओम काकडे, एकांत बोधे, भास्कर काठोके व इतर गावकऱ्यांचा समावेश होता.

# न्यु माजरी खदानीतुन चोरीस गेलेल्या बॅटरीचा गुन्हा उघड

**माजरी । प्रतिनिधी**

११ ऑक्टोबरला न्यु माजरी खान येथिल डोझर सेक्शन येथुन तेथे उभे असलेले डोझर क्र. १३४१६ ची ८ हजार ६०० रुपये किमतीची बॅटरी रात्रदरम्यान अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याबाबत सुरक्षा रक्षक नामे संकेत विनोद लेडांगे रा.चरुरघटी यांनी तक्रार दिल्याने माजरी पोस्टेस अप क्र. १०२ /२३ भादवि कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. सदर गुन्ह्यासंबधाने माजरी शोध पथकाचे पोउपनि भोजराम लांजेवार ,पोहवा रमेश तुराणकर ,पोशि गुरु शिंदे यांनी तपास करुन सदर चोरीचा उलगडा केला असुन १६ ऑक्टोबर ला गुन्ह्यातील आरोपी नामे सागर भाऊराव कुमरे रा.आंबेडकर वार्ड माजरी , सुरज कुमार व्यासमुनी राम वय. २० वर्षे माजरी कॉलरी यांना अटक करण्यात आलेली असुन त्यांचेकडुन८ हजार ६०० रुपये किमतीची




बॅटरी व गुन्ह्यात वापर झालेली ३० हजार रुपये किमतीची एक शाईन मोटार सायकल जप्त करण्यात आलेली आहे. न्यायालयात त्यांचा जामीन ना मंजूर झाल्याने त्यांना जिल्हा कारागृहात पाठवण्यात आले. गुन्ह्याचा पुढील तपास ठाणेदार सपोनि अजितसिंग देवरे यांचे मार्गदर्शनाखाली पोहवा रमेश तुराणकर करित आहेत.

# फ्लाईंग क्लबमुळे वैमानिक होण्याचे स्वप्न साकार होणार

# पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी घेतला प्रगतीचा आढावा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यातील युवक-युवतींना वैमानिक होता यावे, यासाठी राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी पुढाकार घेतला आहे. विद्यार्थ्यांचे आकाशात उंच उडण्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकारण्यासाठी चंद्रपूर येथे फ्लाईंग क्लब स्थापन करून विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्यात येणार आहे. याबाबत पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी नियोजन भवन येथे कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला.

प्रशिक्षणार्थी विमानाचे उड्डाण करण्यासाठी मोरवा येथील धावपट्टीच्या दुरुस्तीसाठी ५ कोटी ६३ लक्ष तर संरक्षण भिंतीसाठी ११ कोटी ९३ लक्ष रुपये तातडीने मंजूर करण्याच्या सूचना ना . मुनगंटीवार यांनी दिल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने येथील धावपट्टीचे कार्पेटिंग विमानाच्याच गतीने करावे, यात संबंधित यंत्रणेने विशेष लक्ष द्यावे. निवड करताना पहिल्या टप्प्यातील १० प्रशिक्षणार्थ्यांमध्ये मागास प्रवर्गातील विद्यार्थी आणि विद्यार्थीनींचा समावेश आवर्जून करावा. तसेच केंद्र शासनाच्या कोल इंडिया, ओ.एन.जी.सी., इंडियन ऑईल, जे.एन.पी.टी., हिंदुजा, अदाणी, टाटा, बिरला आदी उद्योग समूहांच्या सामाजिक दायित्व निधीतून (सीएसआर फंड) विमानांची व्यवस्था करण्यात येईल. त्यासाठी तातडीने परीपूर्ण प्रस्ताव सादर करावा, अशा सूचना पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिल्या.

यावेळी सादरीकरण करताना जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले, दुसऱ्या टप्प्यात हँगरकरिता १० कोटी, फ्रंट ऑफिसकरिता ३७ लक्ष तर प्रोच रोडकरीता २ कोटी ५० लक्ष रुपयांची आवश्यकता आहे. तसेच एक इंजिन असलेली सेस्ना कंपनीची दोन विमाने आणि दोन इंजिन असलेले एक विमान घेण्यात येणार आहे. नुकतेच नागपूर फ्लाईंग क्लबच्या सेस्ना - १७२ आर. या चार आसनी विमानाचे मोरवा विमातनळावर प्रात्यक्षिक घेण्यात आले होते. या विमानाने टेक ऑफ, लँडिंग व हवाई मार्गात येणाऱ्या अडथळयांचे तसेच प्रशिक्षणासाठी इतर आवश्यक बाबींचे निरीक्षण केले. एखाद्या विद्यार्थ्याला वैमानिक होण्यासाठी २०० तास फ्लाईंग अवर्स पूर्ण करणे आवश्यक आहे. मात्र नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे मोठ्या संख्येने होत असलेल्या विमानांच्या आवागमनामुळे वैमानिक प्रशिक्षणासाठी फ्लाईंग अवर्स पूर्ण होण्यास विलंब होतो. त्यामुळे पर्यायी ऑपरेशनल बेस म्हणून चंद्रपूरातील मोरवा विमानतळाचा पर्याय शोधण्यात आला आहे. या बैठकीला जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, सहाय्यक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम., कॅप्टन इझिलारसन व त्यांचे दोन सहकारी अभियंता सादत बेग आणि हरीश कश्यप आदी उपस्थित होते.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .